आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
८ जुलै २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ब्राझिल दौऱ्यावर, विविध क्षेत्रात सामंजस्य करार होणार

- राज्यघटनेतली मूलभूत तत्वं आणि मूलभूत अधिकारांचा एकत्र विचार करून सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी काम करण्याचं सरन्यायाधीशांचं आवाहन

- विधानसभेतल्या विरोधी पक्षनेतेपदाच्या मुद्द्यावरुन विरोधक पुन्हा आक्रमक, सरन्यायाधीशांना निवेदन

**आणि**

- अमेरिकेतल्या टेक्सासमध्ये पूरामुळं १०४ जणांचा मृत्यू

**<><><><>**

ब्राझिलच्या दौऱ्यावर असलेले प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी यांचं आज ब्राझिलिया शहरातल्या आल्वोराडा पॅलेसमध्ये राष्ट्राध्यक्ष लुइझ इनासियो लुला दा सिल्वा यांनी औपचारिक स्वागत केलं. प्रधानमंत्री मोदी आज ब्राझीलच्या अध्यक्षांसमवेत व्यापार, संरक्षण, ऊर्जा, अंतराळ, तंत्रज्ञान, कृषी, आरोग्य यासारख्या परस्पर हिताच्या क्षेत्रात धोरणात्मक भागीदारी दृढ करण्याबाबत चर्चा करणार आहेत. दोन्ही नेत्यांच्या चर्चेनंतर भारत आणि ब्राझील चार करारांवर स्वाक्षऱ्या करतील अशी अपेक्षा असल्याची माहिती भारताचे ब्राझीलमधले राजदूत दिनेश भाटिया यांनी दिली.

**<><><><>**

भारतीय राज्यघटनेतली मूलभूत तत्वं आणि मूलभूत अधिकार हे घटनेचा आत्मा आहेत, या दोन्हींचा एकत्र विचार करून सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी काम केलं पाहिजे, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात उपस्थितांना संबोधित करत होते. कुठल्याही पदासोबत जबाबदारीही येते आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे पाईक असलेल्या मला सरन्यायाधीश पदाची जबाबदारी मिळाली ही अभिमानाची गोष्ट आहे असं ते म्हणाले.

- **होल्ड - सरन्यायाधीश बाइट -**

यावेळी त्यांनी राज्य घटनेमागची बाबासाहेबांची भूमिका उपस्थितांना समजावून सांगितली. घटना दुरुस्ती करून राज्य घटनेच्या मूळ गाभ्याला धक्का लावता येत नाही याचा पुनरुच्चार त्यांनी केला. युद्ध आणि संकटाच्या काळात भारतीय राज्य घटनेनं देशाला जोडून ठेवलं, असंही त्यांनी सांगितलं.

भाषणाआधी न्यायमूर्ती गवई यांचा सत्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला. व्यापक जनहितासाठी गवई यांनी कायद्याचा वापर केला असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले. पहिल्यांदाच सरन्यायाधीशांचा सत्कार विधान भवनात होत असल्याची प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली. तर हा सत्कार ऐतिहासिक असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. हा सत्कार म्हणजे राज्यातल्या जनतेचा आशीर्वाद असल्याची प्रतिक्रिया न्यायमूर्ती गवई यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या सत्काराच्या पूर्वी दोन्ही सभागृहात त्यांच्या अभिनंदनाचा ठराव एकमतानं मंजूर करण्यात आला.

**<><><><>**

विधानसभेतल्या विरोधी पक्षनेत्याचा मुद्दा विरोधी पक्षांनी आज पुन्हा उपस्थित केला. न्यायमूर्ती गवई यांचा सत्कार समारंभाच्या कार्यक्रम पत्रिकेत विधानसभेच्या विरोधी पक्षनेत्याचा उल्लेख नसल्याचा मुद्दा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी उपस्थित केला. यावर, अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी, नवीन विधानसभेच्या स्थापनेनंतर विरोधी पक्षनेत्याच्या निवडीसाठीचा प्रस्ताव यायला चार महिने लागले, त्यावर निर्णय घ्यायला सुमारे तीन महिने लागणं ही काही मोठी बाब नाही, असं मत व्यक्त केलं. यावर विरोधकांनी थोडा गदारोळ केला. त्यानंतर अध्यक्षांनी लक्षवेधी सूचना पुकारल्या.

विधानसभा अध्यक्षांकडून विरोधी पक्षनेत्याची निवड अद्याप झाली नसल्याची बाब सरन्यायाधिशांच्या निदर्शनाला आणून देण्यासाठी महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळानं

त्यांना आज याबाबत निवेदन दिलं. याबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं…

**- होल्ड - बाईट - आदित्य ठाकरे -**

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीच्या मुद्द्यावरही लवकर निकाल देण्याची अपेक्षा त्यांनी सरन्यायाधीशांकडे यावेळी व्यक्त केली.

**<><><><>**

निष्क्रीय असलेली प्रधानमंत्री जनधन बँक खाती बंद करण्याचे कोणतेही निर्देश बँकांना दिलेले नाहीत, असं अर्थ मंत्रालयाने आज स्पष्ट केलं. वित्तीय सेवा विभागाने अशी खाती बंद करायला सांगितल्याची वृत्त माध्यमांमधून प्रसारित झाल्यानंतर मंत्रालयाने हे स्पष्टीकरण दिलं आहे. निष्क्रीय जनधन खात्यांच्या संख्येवर मंत्रालयाची देखरेख असून संबंधित खातेदारांशी संपर्क साधून त्यांची खाती कार्यरत ठेवण्याचा सल्ला वेळोवेळी देण्यात येत असल्याचंही मंत्रालयाने म्हटलं आहे. जनधन योजना खाती, जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना आणि इतर कल्याणकारी योजनांचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी तीन महिन्यांची मोहीम सुरू असल्याची माहिती देखील अर्थ मंत्रालयानं दिली आहे.

**<><><><>**

सीबीआयने ब्रिटन तसंच ऑस्ट्रेलियन नागरिकांना लक्ष्य करणाऱ्या एका सायबर गुन्हेसाखळीचा शोध लावला आहे. या प्रकरणी नोएडामध्ये तीन ठिकाणी छापे टाकून दोषींना ताब्यात घेण्यात आलं. छापे टाकलेल्या ठिकाणी कॉल सेंटर सुरु होतं. तिथून अद्ययावत फोन यंत्रणा, या गुन्हेसाखळीत अडकणाऱ्यांबाबतची महत्वाची माहिती असलेली कागदपत्रे जप्त करण्यात आली.

**<><><><>**

अमेरिकेतल्या टेक्सासमध्ये पूरबळींची संख्या १०४ वर पोहचली आहे, ४१ जण बेपत्ता आहेत. बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्यासाठी मोहीम सुरू असून ही आकडेवारी सातत्यानं बदलत आहे. केर कौंटी इथं सर्वाधिक जीवितहानी झाली आहे. इथं नदी किनारी असलेल्या ख्रिश्चन गर्ल्स कॅम्पमधल्या अनेक बालकांचा मृत्यू झाला असून अनेक बेपत्ता आहेत.

<><><><>

केनियात सुरक्षा दले आणि आंदोलनकर्त्यामध्ये झालेल्या झटापटीत दहाजण मारले गेले तर एकोणतीस जण जखमी झाले. या आंदोलनाचं लोण सतरा परगण्यात पसरलं होतं. दोघाजणांच्या अपहरणानंतर पोलिसांनी सदतीसजणांना ताब्यात घेतलं आहे. वाढलेले कर आणि त्यामुळं आलेली महागाई यामुळं हे आंदोलन सुरू आहे.

<><><><>

इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल पारितोषिक देण्यासाठी शिफारस केली आहे. जागतिक शांततेसाठी त्यांनी केलेले प्रयत्न महत्त्वाचे असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. काल व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या रात्रीच्या जेवणाच्या वेळी त्यांनी नोबेल पारितोषिक समितीला दिलेल्या पत्राची प्रत डोनाल्ड ट्रम्प यांनाही सुपूर्द केली.

<><><><>

तान्ह्या बाळांसाठी आणि बालकांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या जगातल्या पहिल्या हिवताप उपचारपद्धतीच्या वापराला मंजुरी देण्यात आली आहे. नोवार्टिस या फार्मा कंपनीला हिवतापावरच्या 'कोआर्टेम' नावाच्या नवीन औषधाला स्विस अधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळाली आहे. हिवतापामुळे मृत्यू पावणाऱ्यांमध्ये पाच वर्षांखालील मुलांचं प्रमाण अत्याधिक असल्यानं हे औषध विकसित होणं अत्यंत महत्त्वाचं मानलं जात आहे. हिवतापाच्या उपचारासाठी आतापर्यंत तान्ह्या बाळांना मोठ्या मुलांसाठीचं औषध दिलं जात होतं, ज्यामुळे त्यांना अनेक धोके संभवत होते.

<><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने कला सेतू या रियल टाईम लँग्वेज टेक फॉर इंडिया चॅलेंजला सुरुवात केली. भारतातल्या आघाडीच्या एआय स्टार्टअप्सना अनेक भारतीय भाषांमधला मजकूर दृकश्राव्य अथवा ग्राफिकच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठी ॲप्लिकेशन विकसित करण्याचं आव्हान या उपक्रमात ठेवण्यात आलं आहे. लेखी साहित्यापासून व्हिडीओ, ग्राफिक्स आणि ऑडिओ निर्मितीवर या उपक्रमात भर देण्यात

आला आहे. या महिन्याच्या ३० तारखेपर्यंत www.wavex.wavesbazaar.com या अधिकृत संकेतस्थळाच्या माध्यमातून नोंदणी करता येईल.

<><><><>

स्पेनमध्ये माद्रिद इथे आज रात्री सुरू होणाऱ्या तिरंदाजी विश्वचषकाच्या चौथ्या टप्प्यात दीपिका कुमारी आणि ज्योती सुरेखा वेन्नम भारताचं नेतृत्व करतील. या स्पर्धेत ४९ देशांमधले ३३६ तीरंदाज सहभागी होणार असून ही स्पर्धा १३ जुलै पर्यंत सुरू असेल.

<><><><>

विम्बल्डनच्या उपांत्यपूर्व फेरीत आज पुरुष एकेरीत टेलर फ्रिट्झ आणि कॅरन खचानोव्ह यांचा सामना सुरू आहे. दुसरा सामना गतविजेता कार्लोस अल्काराज आणि कॅमेरॉन नॉरी यांच्यात सुरू आहे. काल अग्रमानांकित ग्रेगोर दिमित्रोव्ह यानं दुखापतीमुळे स्पर्धेतून माघार घेतल्यानं अग्रमानांकित यानिक सिनरला पुढच्या फेरीत स्थान मिळालं.

//<><><><>//